। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक ३०५ वा । शुक्रवार दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### कनगरा येथे चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे मोहम्मदरुी आमीन शेख, वय ४५ वर्षे, रा. कनगरा ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचा दरवाजाचा कडी कोंड अज्ञात व्यक्तीने दि.१७.०२.२०२६ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाटातील २३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम १,७०,००० असा एकुण २,८६,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मोहम्मदरफी शेख यांनी दि.१८.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४), ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### तलावातील मोटार व केबलची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- राजपाल वैजनाथ बोराडे, वय ३८ वर्षे, रा. पाथरुड ता. भुम जि. धाराशिव यांचे व पाथरुड शिवारातील दुधोडी पाझर तलावात टाकलेल्या पाण्याच्या मोटारची २५० फुट केबल एकुण ८,००० किंमतीची दि.१८.२.२०२६ रोजी ०७.१५ वा. पुर्वी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राजपाल बोराडे यांनी दि.१८.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### जुगार विरोधी कारवाई

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान भुम पोलीसांनी दि.१८.०२.२०२६ रोजी भुम पोलीस ठाणे हद्दीत हॉटेल शेजारी पत्र्याचे टपरीमध्ये भुम येथे छापा टाकला. यावेळी समाधान वय ३० वर्षे, रा.वंजारवाडी ता. भुम जि. धाराशिव हे . हॉटेल शेजारी पत्र्याचे टपरीमध्ये भुम ता. भुम जि. धाराशिव कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ४,००० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले भुम पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. लोहारा पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान लोहारा पोलीसांनी दि.१८.०२.२०२६ रोजी १३.३० वा. सु. लोहारा पोलीस ठाणे हद्दीत तोरंबा येथे बसस्थानक जवळ छापा टाकला. यावेळी पांडुरंग रा.तोरंबा ता. लोहारा जि. धाराशिव ह तोरंबा येथे बसस्थानक जवळ कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ६५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले लोहारा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## पोवाड्यांतून शिवचरित्राचा जयघोष; धाराशिव येथे शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक सोहळा उत्साहात



धाराशिव दि.१८ फेब्रुवारी (जिमाका) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय,महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आज करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात प्रसिद्ध इतिहास शिवशाहीर बिहारीलाल राजपूत यांच्या दमदार पोवाड्याने झाली.याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. दीपप्रज्वलनानंतर जय जय महाराष्ट्र माझा हे महाराष्ट्र गीत तसेच जिजाऊ वंदना सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे गायिली.

यानंतर शिवशाहीर राणा जोगदंड व त्यांच्या संघाकडून शाहीरी जलसा कार्यक्रम उत्साहात सादर करण्यात आला.या कार्यक्रमात शिवचरित्रातील पराक्रम,स्वराज्याची प्रेरणा आणि जाज्वल्य राष्ट्राभिमान यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.तसेच शुभम खोत व सहकलाकारांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

श्रीपतराव भोसले हायस्कूलचे संगीत शिक्षक महेश पाटील यांनी शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती, मल्हार वारी मोतीयांनी द्यावी भरून- नाहीतर देवा जातो मी दुरुन, आम्ही अंबेचे गोंधळी, या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे ही स्फूर्तीदायक गीते सादर करून वातावरण भारावून टाकले.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष,जिल्हा विधी प्राधिकरण सचिव न्या.भाग्यश्री पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे,उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे,उप विभागीय अधिकारी ओंकार देशमुख,नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे,कळंब नगर परिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती. सुनंदा कापसे,विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष उत्साहाचे वातावरण लाभले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, आदर्श,स्वराज्य संकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे प्रभावशाली वर्णन शिवशाहीरांनी पोवाड्यांच्या माध्यमातून उपस्थितांना ऐकविले.या कार्यक्रमास अधिकारी-कर्मचारी,नागरिक, मान्यवर तसेच विद्यार्थी व युवक-युवती यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## गोवंशीय जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या विरुध्द स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक १८/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा धाराशिवचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार पोलीस स्टापसह पोलीस ठाणे वाशी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पारा येथून फकराबाद येथे सदरील वाहनांमध्ये गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी वाहतुक करण्यात येत असेल असा संशय आल्यावरून पोलीसांनी सदरील वाहनाच्या चालकास गाडी थांबण्याचा इशारा केला. वाहन चालकाने गाडी रोडच्या बाजूला लावली. सदरील वाहनाचे निरीक्षण केले असता वाहनांमध्ये अत्यंत दाटीवाटीने गोवंशीय जनावरे भरले असल्याचे निदर्शनास आले. गाडीमधील गोवंशीय जनावरे कोठून आणलेली आहेत आणि कशासाठी आणलेली आहेत याबाबत वाहन चालकाकडे चौकशी केली असता वाहन चालकाने समाधानकारक उत्तर दिले नाही. सदरील वाहन तात्काळ पोलीस ठाणे वाशी येथे घेण्याची सुचना सदरील वाहन चालकास दिली. वाहन पोलीस ठाणे वाशी येथे आल्यानंतर दोन पंचांच्या समक्ष सदरील वाहनाची निरीक्षण केले असता वाहनांमध्ये चार गोवंशीय जनावरे वाहनासह एकूण ८,८०,०००/- किंमतीचे मिळून आले. सदरील गोवंशीय जनावरांना वाहनांमध्ये अत्यंत दाटीवाटीने भरण्यात आले होते. या जनावरांना गाडीमध्ये हालचाल करण्यासाठी पर्याप्त जागा नव्हती. अत्यंत त्रासदायक पध्दतीने त्यांची वाहतुक करण्यात येत होती. त्यावरुन पोलीस ठाणे वाशी येथे गुन्हा नोंदणी क्रमांक ५४/२०२६ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ (१) (ऊ) (ए) (क), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५(अ) (१), ९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास बळीराम यादव , पोलोस स्टेशन वाशी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, पोलीस हवालदार दयानंद गादेकर, पोलीस हवालदार बळीराम शिंदे, पोलीस अंमलदार पुष्कर मुगळे, पोलीस हवालदार सुभाष चौरे पोलीस स्टेशन वाशी चे पोलीस हवालदार बळीराम यादव यांनी केली आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राहुल रा. कोळसुर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१८.०२.२०२६ रोजी उमरगा ते डिग्गी रोडवरील ओम बालाजी मंगल कार्यालय जवह १०० मिटर अंतरावर अंदाजे १८,८६० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या २४४ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर सुनंदा रा. एकुरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१८.०२.२०२६ रोजी एकुरगा गावातील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे बाजूस अंदाजे २,८०० किंमतीची २८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

## छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवजन्मोत्सवाचा जल्लोष: 'जय मल्हार' फेम अभिनेत्री ईशा केसकर विशेष आकर्षण



धाराशिव(प्रतिनिधी)- मध्यवर्ती सार्वजनिक शिवजन्मोत्सव महोत्सव समितीच्या वतीने दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवजन्मोत्सव पाळणा सोहळा व विविध सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ढोल-ताशांच्या निनादात, शिवभक्तांच्या जयघोषात आणि पारंपरिक सजावटीने नटलेल्या चौकात शिवजन्मोत्सवाचा सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. मध्यरात्री फटाक्याची जोरदार आतषबाजी करून जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून प्रसिद्ध दूरचित्रवाणी मालिका 'जय मल्हार' फेम अभिनेत्री ईशा केसकर यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या आगमनाने शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित नागरिकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

शिवजन्मोत्सव पाळणा सोहळा पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमात जल्लोषपूर्ण सहभाग नोंदविला. त्याचबरोबर संगीत खुर्ची, बकेट-चेंडू, फुग्यांचा खेळ, उखाणे स्पर्धा आदी विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला रंगत आणली. महिलांनी व तरुणींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंदोत्सवात सहभाग घेतला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन संयोजक तथा यशदा परिवाराचे सर्वेसर्वा सुधीर सस्ते आणि मराठा परिवाराच्या व्यवस्थापक दीपांजली माने यांनी कुशलतेने केले. त्यांच्या परिश्रमांमुळे कार्यक्रमाची मांडणी, शिस्तबद्धता आणि सांस्कृतिक सादरीकरण विशेष उठून दिसले.

मध्यवर्ती सार्वजनिक शिवजन्मोत्सव महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा भव्यदिव्य स्वरूपात पार पडला. शिवचरित्राचा गौरव आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमास समितीचे पदाधिकारी शिवप्रेमी आणि महिला व तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती नगराध्यक्ष नेहा काकडे यांच्या उपस्थितीत साजरी



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे वास्तव ग्रुपच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षीही छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी धाराशिव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाला पाणीपुरवठा सभापती विलास बापू लोंढे, नगरसेवक राहुल काकडे, नगरसेविका वंदना बापू पवार, माजी नगरसेवक बापू पवार यांच्यासह लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक परिसरातील असंख्य शिवभक्त उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. शिवभक्तांनी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून समाजात न्याय, समानता आणि स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली, या भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथे वास्तव ग्रुपच्या वतीने हा जयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. उपस्थितांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी वास्तव ग्रुपचे खंडू चांदणे,भारत कांबळे,सोमनाथ पेठे,अजय चव्हाण , पंकज चव्हाण,वीरा चव्हाण, रोहन कदम,गणेश काशीद,योगेश कसबे,बापू चव्हाण,शिवा तुपे आदी उपस्थित होते.

## धाराशिव जिल्हा परिषदेत सत्ता संघर्षाची ठिणगी! शिवसेना-भाजप युतीत पुन्हा तणावाची धग

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदावरून धाराशिवच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. शिवसेना-भाजप युतीमधील तणाव आता उघडपणे समोर येऊ लागला असून, सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या अध्यक्षपदावरून राजकीय हालचालींना वेग आला आहे.

आमदार तानाजी सावंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घेतलेली भेट ही केवळ औपचारिक नसून, जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या समीकरणांवर निर्णायक ठरणारी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

जिल्हा परिषद अध्यक्षपदावरून शिवसेना-भाजप युतीत कायम तणाव दिसून येत असून भाजपने शिवसेनेचे पळवलेले दोन सदस्य पुन्हा परत आणल्याने राजकीय गणित बदलले दिसत आहे. या दोन सदस्यांच्या पुनरागमनामुळे युतीची बोलणी काही काळ लांबली आहे.

अध्यक्षपदाचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार तानाजी सावंत यांच्याकडे सोपवण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही सावंत यांना मोकळीक दिल्याची राजकीय चर्चा आहे.

**धाराशिवच्या राजकारणात काय संकेत?**

धाराशिव जिल्हा परिषद ही आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपद म्हणजे स्थानिक सत्तेचा किल्ला! त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये प्रतिष्ठेची लढाई रंगली आहे. सावंत गटाची भूमिका निर्णायक ठरत असून, भाजप-शिवसेना युतीतील 'मैत्री की स्पर्धा?' असा प्रश्न उपस्थित झाला आहे. सत्तेतील समन्वय राखायचा की स्वतंत्र ताकद दाखवायची, यावर पुढील राजकीय दिशा ठरणार आहे.

**पुढे काय होईल असा अंदाज आहे?**

धाराशिवच्या सत्तासमीकरणात येत्या काही दिवसांत मोठा राजकीय निर्णय होण्याची शक्यता आहे. अध्यक्षपदाच्या निवडीवरून युतीत नवे वळण येणार का? की तणाव आणखी तीव्र हावू शकतो. धाराशिवच्या राजकारणात सध्या 'सत्ता की संघर्ष?' अशी परिस्थिती असून, पुढील काही दिवस जिल्हा परिषदेत राजकीय भूकंप घडवू शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ग्रामीण भाग सर्वार्थाने सक्षम करावा

भारत हा देश प्रामुख्याने ग्रामीण भागात वसलेला आहे. ग्रामीण भागातील मुळ व्यवसाय हा शेती आहे. भारतीय बहुसंख्येने शेती करतात. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकासात प्राधान्य शेतीस दिले पाहिजे. शेतीविषयक समस्याचे निरसण केले पाहिजे. ग्रामीण भागात एकतर कुटीर उद्योग निर्माण केले पाहिजेत किंवा शेतीत येणाऱ्या समस्याचे निरसण केले पाहिजे. भारतीय शेती ही निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्ग साथ देत नाही. वरचेवर निसर्ग हा लहरी बनला आहे. ऋतूमानात बदल होताना दिसून येत आहे. उन्हाळ्यात पावसाळा दिसून येत असेल तर हा बदल कशामुळे झाला यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. वातावरणाचा परिणाम हा निसर्गावर होत आहे. वरचेवर उष्णतेचा परिणाम होत आहे. जागतिक तापमान वाढत असल्याने निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे. त्यामुळे यावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी लागणार आहे. कॉंकेटची जंगले वाढली आहेत. वृक्षतोडीचा परिणाम वातारणावर होताना दिसून येत आहे. याचा सर्वात मोठा परिणाम हा शेतीवर होताना दिसून येत आहे. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पनात घट होताना दिसून येत आहे. जेवढे उत्पादन निघणे अपेक्षित होते ते होत नसल्याने तोट्यात शेती जात आहे. याचा परिणाम भारतीयांचा मुख्य व्यवसाय शेती असला तरी लक्ष दिले जात नाही हेही सत्यच आहे. शेती करण्याचे प्रमाण घटते आहे. शहरी भागापासून जवळ असणारी शेती विकली जात आहे. बिल्डर्सच्या घशात घातली जात आहे. शेत जमीनीवर आता मोठमोठ्या बिल्डींग उभा टाकत आहे. वरचेवर शेतजमीन कमी होत आहे, याचा विचार आताच केला तर बरा, नसता सर्वत्र कॉंक्रिटची जंगली दिसून येतील. एकतर शेतीत उत्पादन घटत आहे. कॉंक्रेटच्या जंगलाने पशुपक्षी नष्ट होताना दिसून येत आहे. पुर्वी सारखे पक्षी दिसून येत नाहीत. कावळे असो किंवा चिमण्या आता शहरी भागात तर दिसून येत नाहीत. ग्रामीण भागात दिसत असल्यातरी प्रमाण कमी आहे. नदी आटल्या आहेत. पुर्वी बाराही महिणे वाहाणाऱ्या नदी आता लोप पावल्या आहेत. यामागील कारणे ग्रामीण भागातील नागरिकांना कळते आहे, तरी काही बाबीकडे दुर्लक्ष केले जाते. आजोबा-पंजोबांनी लावलेली झाडे विकून खाल्ली जात आहेत. राणात सावलीसाठी झाड शोधावे लागते ही वस्तूस्थिती दिसून येते. कॉंक्रेटची जंगले व वाढत्या तापमानाचा परिणाम हा पावसावर झाला. पावुस कमी पडतो आहे, पडला तर अधिक प्रमाणात पडतो त्यामुळे जमीनीत पाणी मुरले जात नाही. अजून मे उन्हाळ्याचा परिणाम सोसायाचा आहे. आता पासून विंधन विहीरीची पाण्याची पातळी घसरली आहे. विहीर आटल्या जात आहेत. केवळ पाण्याच्या समस्यामुळे पिकाचे उत्पादन घटत आहे. जनावरांसाठी पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होतो आहे. त्यापेक्षाही पाणी टंचाईने दूर ठिकाणावरून पाणी आहे तेथून आणणे कठिण होताना दिसून येत आहे. दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याची समस्या निर्माण होते. पाणीटंचाईवर दुष्काळावर मात करण्यासाठी पाण्यासारखा दरवर्षी पैसा खर्च करावा लागत आहे तरी कायम स्वरूपात पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटत नाही ही मोठी समस्या आहे. तरी शासन ग्रामीण भागाकडे म्हणावे तेवढे लक्ष देत नाही . भारताला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्ष होवुन गेले तरी पाण्याचा गंभीर प्रश्नाची सोडवणुक झाली नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे. पुर्वी पेक्षा सध्याला शेतीवी समस्या अधिक कशामुळे? या बाबीवर चिंतन होणे अपेक्षित आहे. ग्रामीण भागात रस्ते व्यवस्थित झाले आहेत. अनेक साखर कारखाने उभारलेली आहेत. असे असताना ग्रामीण भाग अविकसीत कशामुळे याचा विचार झाला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सरकारने आता या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे, ग्रामीण हाच प्रथम विकासाचा केंद्र बिंदु मानला पाहिजे. अनेक कुटीर उद्योगास चालना दिली पाहिजे. ग्रामीण भागात उद्योग, व्यवसायाला चालना दिली पाहिजे. बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक चळवळ उभारली पाहिजे, त्याप्रमाणे गावातील व्यवसायाला प्राधान्य दिले पाहिजे. शेतातील प्रत्येक बाब ही विक्रि होते. पालाभाजी, फळे, फुले, पाचट, कडबा, लाकुड जे दुबके असते, चिंच, शेतीतील माती विक्री होते. शेतीपासून नुकसान होत नाही हे सतत लक्षात घेतले पाहिजे. सरकार आपल्या परिने सहकार्य करीत असले तरी ग्रामीण भागात म्हणावा तसा विकास होणे अपेक्षित आहे. -ग्रामीण भागाचा विकास साधावयाचा झाला तर शेतीत जे काही उत्पादन होते त्याला मार्केट मिळाले पाहिजे. काही झाले तरी शेतीमालास योग्य भाव मिळाला पाहिजे. या बाबत विचार केला पाहिजे. उत्पादित केलेल्या मालास खर्चाएवढा मोबादला मिळत नाही ही मोठी शोकांतिका आहे. वास्तविक सर्व उत्पादित मालाचा भाव हा उत्पादक, उद्योगपती किंवा कारखानदार ठरवितो. शेतकऱ्याच्या उत्पादित मालाचा दर ठरविण्याचे अधिकार शेतकऱ्यास का नसावा? किमान गावातील शेतऱ्यांनी ठरवुन दर शासनास कळविला पाहिजे व दराचे मागणी केली पाहिजे. ज्वारी दहाहजार रू क्विंटल दर ठेवला पाहिजे. असे होत नाही. पाच रूपये मेथीचा दर असेल तर यापेक्षा कमी नाही का असा प्रश्न केला जातो. तोच दारू दुकानात किंवा बारमध्ये केला जात नाही ही वस्तूस्थिती आहे. शेतकऱ्याचे दुध घरोघरी किंवा सोसायटीमध्ये विकले जाते तर दारू ही लाईन लावून खरेदी केली जाते. त्यामुळे शेतकऱ्याचा विकास म्हणजे ग्रामीण भागाचा विकास आहे. ग्रामीण भागातील विकासाची क्रांती आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यानुसार सरकारचे पावुल पडले पाहिजे. ग्रामीण भागात शहरापेक्षा कमी नागरिक राहातात. वाड्या-तांडे भरपूर आहेत. या ठिकाणाचा व्यवसाय शेती आहे. ज्या देशातील नागरिकांचा बहुसंख्याचा मुख्य व्यवसाय शेती आहे. या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सरकारने निश्चित याबाबीकडे लक्ष दिले तर समाधानाचे दिसून येईल.

# उत्सवाबरोबर विचारांचा वारसासुद्धा जपू या...

महाराष्ट्राला स्वतःचे अस्तित्व मिळवून देणारे व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांनी न्याय, स्त्रीसन्मान आणि धर्मनिरपेक्षतेवर आधारित राज्यव्यवस्था उभारली. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातल्या अठरापगड जातींचे दैवत आहेत.त्यामुळे शिवजयंती हा दिवस प्रत्येक मराठी कुटुंबासाठी उत्सव आहे.या दिवशी प्रत्येक मराठी मावळा आनंदाने आपल्या राजाची जयंती साजरी करतो व मानाने त्यांना अभिवादन करतो. परंतु शिवजयंती म्हणजे केवळ राजांच्या जयंतीचा उत्सव नसून त्यांच्या विचारांना स्वीकार करण्याची संधी देणारा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी शिस्त, संयम आणि लोककल्याण यांना प्राधान्य दिले.हा जयंती उत्सव साजरा केल्याने समाजातला एकोपा वाढतो.आपण शिवाजी महाराजांच्या जीवनाकडे पाहिले, तर ते शिस्तप्रिय, लोकाभिमुख आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. मग ही दूरदृष्टी लोकशाहीमध्ये असलेल्या प्रत्येक मावळ्यांमध्ये असली पाहिजे.आज महाराजांच्या विचारांचा वारसा आपल्याला जपायचा आहे आणि पुढच्या पिढीमध्ये हस्तांतरित करायचा आहे.जयंतीनिमित्ताने गरजूंसाठी अन्नदान व रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहिमा आणि वृक्षारोपण, पर्यावरण रक्षण, इतिहास व विचारांवर व्याख्याने, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा व वाचन उपक्रम, असे समाजोपयोगी उपक्रम घेतले पाहिजेत. त्याची संख्या, स्वरूप आणि व्याप्ती वाढली पाहिजे.छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन आपल्याला शिकवते: स्वाभिमान म्हणजे इतरांचा अपमान नव्हे; शक्ती म्हणजे संरक्षण, आक्रमण नव्हे; नेतृत्व म्हणजे सेवा, सत्ता नव्हे.

जर आपण त्यांचे विचार आत्मसात केले, तर समाजात सौहार्द वाढेल, युवकांना योग्य दिशा मिळेल, राष्ट्रनिर्मितीत सकारात्मक योगदान होईल.आज तरुणांनी स्वतःला विचारावे. मी छत्रपती शिवाजी महाराजांकडून काय शिकतो? माझ्या कृतींमध्ये शिस्त आणि जबाबदारी आहे का?

समाजासाठी मी काय योगदान देतो? आजच्या तरुणांनी शिवजयंतीला केवळ मिरवणूक न समजता ती चरित्र घडविण्याचा दिवस मानायला हवा.शिवजयंतीचा खरा अर्थ विचारांच्या जागृतीत आहे. चला, यंदाची शिवजयंती आपण वेगळ्या पद्धतीने साजरी करूया दिखाव्यापेक्षा विचार, गोंगाटापेक्षा संस्कार, आणि उत्सवापेक्षा आदर्श यांना प्राधान्य देऊया. ''शिवरायांचे नाव घेणे सोपे आहे; पण त्यांचे विचार कृतीने जगणे हीच खरी शिवभक्ती आहे.''



**डॉ. दिप्ती ढेरे**
**सहाय्यक प्राध्यापक**
**सूक्ष्मजीवशास्त्र विभाग**
**दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर**

# छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकालीन स्वराज्याचे रसायनशास्त्र



छत्रपती शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य केवळ गनिमी काव्यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यामागे रसायनशास्त्र, धातूशास्त्र, दारूगोळा निर्मिती, आरमारी संरक्षण तंत्र आणि बांधकामातील रासायनिक ज्ञान यांचा ठोस पाया होता. यालाच स्वराज्याचे रसायनशास्त्र असे म्हणता येईल. शत्रूकडे असलेली आधुनिक शस्त्रास्त्रे आणि त्यांना उत्तर देण्यासाठी महाराजांनी विकसित केलेले स्वदेशी तंत्रज्ञान म्हणजे 'स्वराज्याचे रसायनशास्त्र' होय. मराठा सैन्याचा कणा जरी तलवारबाजी आणि घोडदळ असला, तरी रासायनिक स्फोटकांचा (प्रामुख्याने दारूगोळा) वापर अत्यंत कल्पकतेने केला जात असे.



तोफगोळे आणि दारूगोळा (Gunpowder Chemistry): त्याकाळी तोफेच्या दारूमध्ये शोरा (Saltpeter/Potassium Nitrate), गंधक (Sulfur) आणि कोळसा (Charcoal) यांचे ठराविक गुणोत्तर वापरले जाई. मुख्य रासायनिक घटक त्या काळातील मुख्य स्फोटक म्हणजे काळी दारू (Black Powder), जी गंधक, कोळसा आणि सॉल्टपीटर, (Shoru/Potassium Nitrate) यांचे मिश्रण असे. परकीय व्यापाऱ्यांवरील (इंग्रज, पोर्तुगीज) अवलंबित्व कमी करण्यासाठी महाराजांनी स्वतःचे दारूगोळा बनवण्याचे कारखाने सुरू केले. सह्याद्रीतील दमट हवामानात दारूगोळा निकामी होऊ नये, म्हणून सॉल्टपीटरच्या शुद्धतेवर त्यांचा कडक कटाक्ष असे. कोकणातील दमट हवामानात दारूगोळा खराब होऊ नये म्हणून त्याचे शुद्धीकरण करण्याचे विशेष तंत्र मराठा फौजेकडे होते.

किल्ल्यांचे बुरुज पाडण्यासाठी याचा वापर केला जाई. शत्रूच्या किल्ल्याच्या तटाखाली भुयारी मार् (सुरुंग) (Mining) खोदले जात. या सुरुंगात मोठ्या प्रमाणात दारूगोळा भरला जाई. त्याचा स्फोट करून तटात खिंडार पाडले जाई, जेथून पायदळ आत प्रवेश करू शके.

अग्नीबाण(पहिले रॉकेट): महाराजांनी हे ओळखले होते की, मुघल आणि दख्खनी सुलतानांच्या तोफखान्याचा सामना करण्यासाठी 'अग्नीशस्त्रात' प्रभुत्व मिळवणे आवश्यक आहे. जळजळीत रसायनांचा वापर करून शत्रूच्या छावणीत आग लावण्यासाठी विशेष बाण तयार केले जात. आधीपासूनच मराठे लोखंडी आवरणाचे बाण वापरत असत. या लोखंडी नळ्यांमुळे जास्त दाब निर्माण होऊन हे बाण लांबवर जात आणि मोठा स्फोट घडवत. शत्रूच्या घोडदळात घबराट पसरवण्यासाठी आणि त्यांच्या रसद साठ्याला आग लावण्यासाठी याचा वापर होत असे. कारण ते त्या काळातील एक प्रगत 'केमिकल वेपन' होते. मराठा 'बाण' (Early Rockets) आणि त्यांची रासायनिक रचना, मराठ्यांनी वापरलेले बाण हे आजच्या रॉकेटचे पूर्वज मानले जातात. युरोपियन देशांमध्ये त्यावेळी बांबूचे बाण वापरले जात, पण भारतामध्ये (आणि विशेषतः मराठ्यांनी) त्यात महत्त्वाचे बदल केले होते.



**प्रा. रवींद्र संदीपन शिंदे**
**प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग**
**दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर**

रासायनिक रचना (Chemical Composition): बाणामध्ये प्रामुख्याने काळ्या दारूचा (Black Powder) वापर केला जाई. याचे रासायनिक सूत्र ढोबळमानाने खालीलप्रमाणे असे. सॉल्टपीटर (Potassium Nitrate - KNO3): ७५% (हा ऑक्सिडायझर म्हणून काम करायचा), गंधक (Sulfur - S), १०% (जळण्याची गती वाढवण्यासाठी), कोळसा (Charcoal - C): १५% (इंधन म्हणून). या मिश्रणात अनेकदा लोखंडाचा कीस (Iron Filings) किंवा अमोनियम क्लोराईड मिसळले जाई, ज्यामुळे स्फोट झाल्यावर आगीच्या ठिणग्या जास्त काळ टिकत आणि शत्रूच्या छावणीत आग लागायला मदत होई.

लोखंडी आवरणाचे महत्त्व: बांबूच्या तुलनेत लोखंडी नळी वापरण्याचे दोन मोठे फायदे होते. जास्त दाब (High Pressure) लोखंडी नळी फुटण्यापूर्वी आतमध्ये गॅसचा प्रचंड दाब निर्माण व्हायचा, ज्यामुळे बाण जास्त वेगाने आणि लांब अंतरापर्यंत (सुमारे १ ते १.५ किमी) जाऊ शकत असे. बाण जेव्हा शत्रूच्या सैन्यात पडायचा, तेव्हा तो केवळ आगीचा गोळा न राहता एखाद्या बॉम्बसारखा फुटायचा. त्याचे ऐतिहासिक उदाहरण म्हणजे कल्याणचा वेढा किंवा आरमार युद्ध शिवाजी महाराजांनी आणि त्यानंतर कान्होजी आंग्रे यांनी इंग्रज आणि सिद्दींविरुद्धच्या युद्धात या स्फोटक बाणांचा प्रभावी वापर केला होता. लाकडी जहाजांवर हे 'अग्नीबाण' सोडले की ती जहाजे मध्य समुद्रातच पेट घेत असत. मुघल सैन्यात हत्तींचा मोठा वापर व्हायचा. बाणांच्या आवाजामुळे आणि आगीमुळे हे हत्ती बिथरत आणि स्वतःच्याच सैन्याला पायदळी तुडवत असत.

धातूशास्त्र: रहस्य (Metallurgy): मराठ्यांच्या तलवारी त्यांच्या लवचिकतेसाठी आणि अफाट धारेसाठी ओळखल्या जात. कार्बनचे प्रमाण: पोलाद तयार करताना त्यातील कार्बनचे प्रमाण (Carbon Content) नियंत्रित करणे हे एक रासायनिक कौशल्य होते. यामुळे तलवार युद्धात तुटत नसे. अरबी समुद्रातील खाऱ्या हवेमुळे शस्त्रांना गंज लागू नये, म्हणून त्यावर विशिष्ट तेलांचे आणि रसायनांचे लेप लावले जात.

आरमारी रसायनशास्त्र (Naval Chemistry): शिवाजी महाराजांच्या जहाजांचे लाकूड दीर्घकाळ टिकावे म्हणून त्यावर 'चुनम' (Chunaı) आणि डिंकासारख्या नैसर्गिक पदार्थांचा वापर केला जाई. हे मिश्रण जहाजाच्या तळाला लावले जात असे, जेणेकरून समुद्रातील जलचर किंवा क्षार लाकडाचे नुकसान करू शकणार नाहीत. महाराजांच्या आरमाराने अग्नी-नौका आणि प्राथमिक स्वरूपाच्या हातगोळ्यांचा वापर केला.

तोफा: गुराब आणि गलबतांसारख्या जहाजांवर वेगवेगळ्या क्षमतेच्या तोफा असत. हातगोळे, दारूगोळा आणि ज्वालाग्राही रसायने भरलेली मातीची भांडी (हुक्का) (Hand Grenades) शत्रूच्या जहाजावर फेकली जात. किल्ल्यांच्या बांधकामात वापरला जाणारा चुना, गूळ, बेलफळ आणि इतर नैसर्गिक रसायनांचे मिश्रण आजही इतके मजबूत आहे की कित्येक शतकांनंतरही ते कोसळलेले नाहीत. हे 'सिमेंट' नसून रासायनिक प्रक्रियेतून तयार झालेले एक अजोड मिश्रण होते. शिवकालीन स्वराज्याचे रसायनशास्त्र हे केवळ युद्धातील स्फोटकांपुरते मर्यादित नव्हते; ते धातूशास्त्र, आरमारी संरक्षण, बांधकाम तंत्र आणि स्वदेशी उत्पादन व्यवस्थेपर्यंत विस्तारलेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी उपलब्ध संसाधनांचा वैज्ञानिक अभ्यास करून त्यांचा राष्ट्ररक्षणासाठी परिणामकारक उपयोग केला. आत्मनिर्भरता, तांत्रिक कौशल्य आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा संगम म्हणजेच शिवकालीन स्वराज्याचे रसायनशास्त्र होय.

## झोपण्यापूर्वी करावयाचा व्यायाम



निरोगी राहण्यासाठी तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी दररोज पाच ते दहा मिनिटे भिंतीचा आधार घेऊन पाय वर करून झोपलात तर त्याचे शरीराला अनेक आश्र्चर्यकारक फायदे मिळतात. या साध्या स्थितीमुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि थकवा दूर होण्यास मदत होते. हे आसन करण्यासाठी सर्वप्रथम शांतपणे जमिनीवर किंवा बेडवर झोपा आणि तुमचे दोन्ही पाय भिंतीचा आधार घेऊन वरच्या बाजूला सरळ करा. तुमचे नितंब भिंतीपासून थोडे मागे ठेवा जेणेकरून तुम्हाला आरामदायक वाटेल. नाकाने हळूहळू श्र्वास घ्या आणि शरीर पूर्णपणे शिथिल सोडा. शरीरावर कोणताही ताण किंवा जोर देऊ नका. हे आसन जेवणानंतर किमान दोन ते तीन तासांनी करावे आणि या पाच ते दहा मिनिटांच्या काळात मोबाईलचा वापर पूर्णपणे टाळावा.

तुम्ही दररोज असे केले तर तुमच्या पायांची सूज आणि वेदना कमी होतात. यामुळे मज्जासंस्था शांत होते ज्यामुळे चांगली झोप लागते आणि शरीरातील कोर्टिसोल म्हणजेच तणाव निर्माण करणार्या संप्रेरकाची पातळी कमी होते. या स्थितीमुळे ओटीपोटाच्या भागातील रक्तप्रवाह वाढतो ज्याचा सकारात्मक परिणाम प्रजनन क्षमतेवर होतो. तसेच मासिक पाळीतील सौम्य वेदनांपासूनही आराम मिळू शकतो. हे आसन कंबरदुखीवर रामबाण उपाय ठरू शकते. ज्यांना अनियंत्रित उच्च रक्तदाब ग्लुकोमा आहे त्यांनी हे आसन टाळावे. तसेच वारंवार चक्कर येण्याची तक्रार असणार्यांनी ही स्थिती टाळणे हिताचे ठरेल.

## चाळिशी ओलांडल्यानंतर सार्कोपेनियाची समस्या



चाळिशी ओलांडल्यानंतर अनेकदा जिने चढताना दम लागणे किंवा जड पिशव्या उचलताना त्रास होणे अशा समस्या जाणवू लागतात. या कमकुवतपणाचे मुख्य कारण म्हणजे 'सार्कोपेनिया'.

सार्कोपेनिया म्हणजे वयानुसार स्नायूंचे वस्तुमान आणि त्यांची शक्ती कमी होणे. ही प्रक्रिया अत्यंत संथ आणि छुपी असते, त्यामुळे अनेकदा त्याचे गांभीर्य लक्षात येत नाही. विज्ञानानुसार वयाच्या ३० ते ४० वर्षांच्या दरम्यान स्नायूंचा र्हास होण्यास सुरुवात होते. दर दशकामध्ये शरीरातील सुमारे ३ ते ८ टक्के स्नायू कमी होतात. दिवसभर हालचाल कमी असणे, आहारात प्रथिनांचे प्रमाण कमी असणे, मानसिक ताण किंवा अति वजनामुळे शरीरात होणारी अंतर्गत जळजळ ही याची कारणे आहेत. वयाच्या पन्नाशीनंतर ही प्रक्रिया अधिक वेगाने वाढते, ज्यामुळे हाताची पकड कमकुवत होणे, चालण्याचा वेग मंदावणे आणि तोल जाऊन पडण्याच्या घटना वाढू लागतात. भारतीय आहारामध्ये कर्बोदकांचे प्रमाण जास्त आणि प्रथिनांचे प्रमाण कमी असल्याने, विशेषतः शहरातील डेस्क जॉब करणार्या व्यक्तींमध्ये ही समस्या लवकर दिसून येते. आजच्या जीवनात तासनतास बसून राहिल्यामुळे स्नायूंना मिळणारे संकेत कमी होतात. अपुरी झोप आणि जेवण वेळेवर न घेतल्यामुळे रात्रीच्या वेळी स्नायूंची होणारी दुरुस्ती थांबते. भारतात आढळणारी जीवनसत्त्व 'डी'ची कमतरता आणि मधुमेह यांसारख्या आजारांमुळे स्नायूंच्या र्हासाची गती वाढते. 'क्लीव्हलॅंड क्लिनिक'च्या अभ्यासानुसार, जर तुम्ही प्रतिकार व्यायाम केला नाही किंवा प्रत्येक जेवणात २० ते ३० ग्रॅम प्रथिने घेतली नाहीत, तर सार्कोपेनियाचा धोका अधिक बळावतो. स्नायूंची ताकद टिकवून ठेवण्यासाठी आठवड्यातून किमान दोनदा खालील व्यायाम फायदेशीर ठरते: हाफ वॉल स्क्वॅटस्: भिंतीला पाठ लावून उभे राहा आणि गुडघ्यात वाकून खाली बसा (खुर्चीवर बसल्याप्रमाणे) आणि पुन्हा वर या. वॉल प्रेसेस : भिंतीसमोर उभे राहून हाताचे तळवे भिंतीवर खांद्याच्या रेषेत ठेवा. कोपर वाकवून छाती भिंतीजवळ न्या आणि पुन्हा मागे ढकला. यामुळे छाती आणि खांद्याचे स्नायू मजबूत होतात.

## पोटभर जेवल्यानंतरही भूक लागतेय?

अनेकदा पुरेसे जेवण करूनही थोड्याच वेळात पुन्हा भूक लागल्याची जाणीव होते. याचे मुख्य कारण तुमची इच्छाशक्ती नसून तुमच्या आहारातील चुकीची निवड असू शकते.

काही पदार्थ वरवर आरोग्यदायी वाटत असले तरी, ते शरीरातील रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढवतात किंवा कमी करतात. यामुळे भूक अधिक तीव्र होते. हे पदार्थ खाल्ल्यानंतर पोट भरल्याची भावना निर्माण होण्याऐवजी शरीरात 'इन्सुलिन स्पाईक्स', संप्रेरकांचे असंतुलन आणि ऊर्जेची पातळी अचानक कमी होणे असे प्रकार घडतात. परिणामी, शरीर वारंवार अन्नाची मागणी करू लागते. अन्नातून खरी तृप्ती मिळवण्यासाठी फायबर, प्रोटिन आणि हेल्दी फॅट यांचे योग्य संतुलन असणे अत्यंत आवश्यक आहे. हे संतुलन बिघडते, तेव्हा शरीराला लवकर पुन्हा भूक लागते. फळांचा रस हे आरोग्यासाठी उत्तम मानले जात असले तरी, जेव्हा आपण फळांचा रस पितो तेव्हा त्यातील फायबर पूर्णपणे निघून गेलेले असते. रसामध्ये असलेल्या नैसर्गिक साखरेमुळे रक्तातील साखरेची पातळी लगेच वाढते आणि तितक्याच वेगाने ती खाली येते. यामुळे काही वेळातच पुन्हा तीव्र भूक लागते आणि गोड खाण्याची ओढ निर्माण होते. व्हाईट ब्रेड हा रिफाईंड कार्बो हायड्रेटस्पासून बनलेला असतो. यामुळे पोट भरल्याची जाणीव करून देणारे सॅटायटी हार्मोन्स सक्रिय होऊ शकत नाहीत. म्हणूनच ब्रेड खाल्ल्यानंतर अवघ्या काही वेळातच पुन्हा भूक जाणवू लागते. बाजारात मिळणारे 'फ्लेवर्ड योगर्ट' हे प्रथिनांच्या बाबतीत कमकुवत आणि साखरेच्या बाबतीत वरचढ असतात. यातील साखरेचे जास्त प्रमाण 'इन्सुलिन स्पाईक्स' निर्माण करत असल्यामुळे अन्नाची ओढ आणि भूक वाढते. त्याऐवजी साधे दही खाणे हा केव्हाही उत्तम पर्याय ठरतो. सकाळच्या न्याहारीसाठी वापरले जाणारे बहुतेक 'ब्रेकफास्ट सीरिअल्स' हे 'अल्ट्रा प्रोसेस्ड' असतात. यामध्ये फायबरचे प्रमाण नगण्य असते. सकाळी उठल्यानंतर लगेच असे पदार्थ खाल्ल्याने इन्सुलिन वेगाने वाढते, ज्यामुळे दिवसाची सुरुवात भूक आणि थकव्याने होऊ शकते. भूक नियंत्रित ठेवण्यासाठी अख्खी धान्ये आणि संपूर्ण फळे खाण्यावर भर द्यावा. प्रथिनांचे पुरेसे सेवन आणि प्रक्रिया केलेल्या अन्नापासून दूर राहिल्यास केवळ भूक संतुलित राहत नाही, तर वजन आणि ऊर्जेची पातळी देखील सुधारते. आरोग्याशी संबंधित अधिक माहितीसाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे केव्हाही हिताचे ठरते.




## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाकिस्तानने दुबळ्या नामिबियाला नमविले




कोलंबो : पाकिस्तानने लीग टप्प्यातील अखेरच्या सामन्यात नामिबियावर तब्बल १०२ धावांनी दणदणीत विजय मिळवला आणि सुपर-८मध्ये प्रवेश करणारा शेवटचा संघ ठरला. या विजयासह पाकिस्तानने पुढील वर्षी होणार्या विश्वचषकासाठी थेट पात्रताही मिळवली. या सामन्याचा खरा नायक साहिबजादा फरहान ठरला. त्याने ५८ चेंडूत नाबाद १०० धावांची झंझावाती खेळी करत पाकिस्तानला ३ बाद १९९ धावांपर्यंत नेले. आपल्या खेळीत त्याने ११ चौकार आणि ४ षटकार ठोकले. विशेष म्हणजे ५० वरून १०० धावांपर्यंत पोहोचण्यासाठी त्याने फक्त २० चेंडू घेतले. विश्वचषक स्पर्धेत शतक झळकावणारा तो पाकिस्तानचा दुसरा फलंदाज ठरला. यापूर्वी २०१४ मध्ये अहमद शहजाद याने बांगलादेशविरुद्ध शतक झळकावले होते.

### सूर्यकुमार यादवचा 'तो' एक निर्णय ठरला ऐतिहासिक!

मुंबई-भारतात सध्या टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धे



चा थरार सुरू आहे. या स्पर्धेत भारतीय संघाचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. सूर्यकुमार यादव पहिल्यांदाच मोठ्या स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करण्यासाठी मैदानात उतरला आहे. पहिल्या सामन्यापासून भारतीय संघाने चॅम्पियनसारखा खेळ केला आहे. सुपर ८ मध्ये स्थान मिळवल्यानंतर नेदरलँड्सविरुद्धचा सामना हा भारतीय संघासाठी सराव सामन्यात सारखाच होता. या सामन्यात भारतीय संघाने दमदार खेळ केला आणि एकतर्फी विजयाची नोंद केली. भारतीय संघ या स्पर्धेत अजिंक्य आहे. दरम्यान या सामन्यात भारतीय संघाने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.पहिल्यादांच टी -२० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व करत असलेल्या सूर्यकुमार यादवने सुरुवातीच्या ४ सामन्यात अनेक महत्वाचे बदल करून पाहिले आहेत. यासह १६ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड मोडला गेला आहे. भारतीय संघाने या स्पर्धेतील ४ सामन्यांमध्ये १२ गोलंदाजांचा वापर केला आहे. याआधी असे कधीच घडले नव्हते. तो असा प्रयोग करणारा पहिलाच भारतीय कर्णधार ठरला आहे.

### भारत-पाकिस्तानची पुढची मॅच कधी आणि कुठे होणार?

मुंबई-टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये टीम इंडिया दमदार फॉर्ममध्ये दिसत आहे. आतापर्यंतच्या चार सामन्यांत भारताने प्रतिस्पर्ध्यांना एकतर्फी पराभूत केले आहे. पाकिस्तानविरुद्धचा सामना सर्वाधिक चर्चेत होता, पण त्या लढतीतही भारताने वरचष्मा राखत विजय मिळवला. आता सुपर ८ फेरी निश्चित झाल्यानंतर एक मोठा प्रश्न चर्चेत आला आहे तो म्हणजे भारत आणि पाकिस्तान यांची या स्पर्धेत पुन्हा एकदा गाठ पडू शकते का? भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ गट अ मध्ये होते. त्यामुळे सुपर ८ टप्प्यात त्यांची पुन्हा लढत होण्याची शक्यता नाही. मात्र दोन्ही संघांनी उपांत्य फेरीत (सेमीफायनल) प्रवेश मिळवला, तर दुसऱ्या सामन्याची शक्यता निर्माण होऊ शकते. यासाठी सुपर ८ मध्ये पात्र ठरलेल्या संघांची रचना समजून घेणे आवश्यक आहे. सुपर ८ साठी दोन गट तयार करण्यात आले आहेत. उ१ प्री-सीडिंग: झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, भारत प्रत्येक गटातील संघ इतर तिन्ही संघांविरुद्ध सामने खेळतील. या सामन्यांच्या निकालांवरून प्रत्येक गटातील अव्वल आणि दुसऱ्या क्रमांकाचा संघ ठरेल. हे दोन्ही संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील.




# अफगाणिस्तानचा कॅनडावर ८२ धावांनी दमदार विजय

## झादरानची फटकेबाजी अनब नबीची जादू!

नवी दिल्ली: आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत अफगाणिस्तान आणि कॅनडा यांच्यात झालेल्या सामन्यात अफगाणिस्तानने दमदार विजयाची नोंद केली आहे.

आयसीसी टी -२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात आहे. स्पर्धेतील ३९ वा सामना अफगाणिस्तान आणि कॅनडा या दोन्ही संघांमध्ये पार पडला. हे दोन्ही संघ सुपर ८ च्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत, त्यामुळे या सामन्याचा सुपर ८ च्या निकालावर काही फरक पडणार नव्हता. पण शेवटच्या सामन्यात अफगाणिस्तानने पूर्ण जोर लावला. या सामन्यात अफगाणिस्तानने कॅनडासमोर विजयासाठी २०१ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना कॅनडाचा डाव अवघ्या ११८ धावांवर आटोपला. यासह अफगाणिस्तानने हा सामना ८२ धावांनी आपल्या नावावर केला.

या सामन्यात कॅनडाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या अफगाणिस्तानकडून रहमानुल्लाह गुरबाजने २० चेंडूत ३० धावांची खेळी केली. तर इब्राहिम झादरान शेवटपर्यंत खेळपट्टीवर टिकून राहिला. त्याने ५६ चेंडूत ९५ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ७ चौकार आणि ५ षटकार खेचले. तर गुलबदीन नईम १ धाव करून माघारी परतला. शेवटी सेदीकुल्लाह अटलने ३२ चेंडूत ४४ धावा केल्या. या खेळीच्या बळावर अफगाणिस्तानने ४ गडी बाद २०० धावा केल्या.

कॅनडाला हा सामना जिंकण्यासाठी २०१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना कॅनडाला सुरुवातीलाच मोठे धक्के बसले. युवराज सामरा अवघ्या १७ धावा करत माघारी परतला. तर दिलप्रीत बाजवाने १३ धावा केल्या. नवनीत धलीवाल शून्यावर माघारी परतला. मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना कॅनडाचे टॉप ३ फलंदाज पूर्णपणे फ्लॉप ठरले. हर्ष ठकेरला चांगली सुरूवात मिळाली होती. पण तो ३० धावा करून माघारी परतला होता. तर निकोलस किरटॉनने १० धावा केल्या. तर साद बीन जफरने २८ धावा केल्या. कॅनडाचा संपूर्ण डाव अवघ्या ११८ धावांवर आटोपला.

अफगाणिस्तानकडून गोलंदाजी करताना मोहम्मद नबी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. नबीने ४ षटकात अवघ्या ७ धावा खर्च करून ४ गडी बाद केले. तर कर्णधार राशिद खानने ४ षटकात १९ धावा खर्च करून २ गडी बाद केले. तर मुजीब उर रहमान आणि अजमतुल्लाह ओमरजाईने प्रत्येकी १-१ गडी बाद केला. अफगाणिस्तानला या स्पर्धेतील ४ पैकी २ सामन्यांमध्ये विजय मिळवता आला आहे. ४ गुणांसह तिसऱ्या स्थानी राहिला.

## वेस्ट इंडिजची विजयी घोडदौड कायम, इटलीवर विजय

कोलकाता-आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या साखळी फेरीत वेस्ट इंडिजने आपला दबदबा कायम राखत इटलीचा ४२ धावांनी पराभव केला. या विजयासह वेस्ट इंडिजने गट-क मध्ये आपले अव्वल स्थान अधिक भक्कम केले असून, इटलीचे आव्हान मात्र संपुष्टात आले आहे.

प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने निर्धारित २० षटकांत ६ बाद १६५ धावांचा डोंगर उभा केला. सलामीवीरांनी दिलेल्या मध्यम सुरुवातीनंतर मधल्या फळीतील फलंदाजांनी फटकेबाजी करत संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली. इटलीच्या गोलंदाजांनी सुरुवातीला काही प्रमाणात विंडीजला रोखून धरले होते, मात्र अखेरच्या षटकांत धावांचा ओघ वाढल्याने वेस्ट इंडिजने १६५ धावांपर्यंत मजल मारली.

१६६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इटलीची सुरुवात अत्यंत खराब झाली. वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाजांनी टिच्चून मारा करत इटलीच्या फलंदाजांना मोकळीक दिली नाही. इटलीचा संपूर्ण संघ १८ व्या षटकात अवघ्या १२३ धावांत गारद झाला. इटलीच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करण्यात यश आले नाही, परिणामी त्यांना मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला.वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध कामगिरी केली. अचूक टप्पा आणि वेगाच्या जोरावर त्यांनी इटलीला सुरुवातीपासूनच दबावाखाली ठेवले. क्षेत्ररक्षणातही विंडीजने चोख कामगिरी बजावत इटलीच्या आशा धुळीस मिळवल्या. या विजयामुळे वेस्ट इंडिजचा आत्मविश्वास दुणावला असून आता सर्वांचे लक्ष आगामी मसुपर-८फ फेरीतील त्यांच्या कामगिरीकडे लागले आहे.

थोडक्यात धावफलक: वेस्ट इंडिज: १६५६ (२० षटके) इटली: १२३१० (१८ षटके) निकाल: वेस्ट इंडिज ४२ धावांनी विजयी.



इटलीतील लिविग्नो येथे सुरू असलेल्या मिलान-कॉर्टिना ऑलिंपिक हिवाळी खेळांमध्ये पुरुषांच्या स्नोबोर्ड स्लोपस्टाईल फायनलमध्ये भाग घेणारी चीनची सु यिमिंग.

## इरफानचा थेट वार! पाकची लायकी काढत म्हणाला,फक्त दुबळ्या संघांसमोर तुमचा वाघ...

मुंबई-आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये नामिबियाविरुद्ध दणदणीत विजय मिळवत पाकिस्तानने सुपर-८ फेरीत प्रवेश केला आहे. मात्र या विजयानंतर भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठान यांच्या एका वक्तव्याने सोशल मीडियावर नवा वाद पेटला आहे.

पाकिस्तानने नामिबियाविरुद्ध सर्वच विभागांत दमदार कामगिरी करत तब्बल १०२ धावांनी सामना जिंकला. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर त्यांनी वर्चस्व गाजवले. या विजयाच्या जोरावर पाकिस्तानने सुपर-८ साठी पात्रताही मिळवली. सामन्यानंतर समालोचनादरम्यान इरफान पठान म्हणाला की, दुबळ्या संघांसमोर आणि खालच्या क्रमांकाच्या संघाविरुद्ध पाकिस्तान संघ हा खूप मजबूत वाघ दिसतो. त्यांच्या या वक्तव्याचा अनेकांनी पाकिस्तानच्या कामगिरीवर टोमणा म्हणून अर्थ लावला आहे. त्यामुळे क्रिकेटविश्वात चर्चेला उधाण आले आहे.

मोठ्या संघांसमोर का ढेपाळतो पाकिस्तान?

या स्पर्धेत पाकिस्तानने नेदरलँड्स, अमेरिका आणि नामिबिया यांसारख्या संघांविरुद्ध विजय मिळवला. मात्र भारताविरुद्धच्या सामन्यात त्यांना एकतर्फी पराभव पत्करावा लागला.

### सिकंदरवर उचलला हात; कुस्ती वादाच्या भोवऱ्यात

पुणे,१९ फेब्रुवारी-महाराष्ट्राचा नामवंत मल्ल सिकंदर शेख याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील पौड येथे झालेल्या कुस्ती दरम्यान घडलेल्या गोंधळाची चर्चा रंगली आहे. मल्लिकार्जुन कुस्ती किताब स्पर्धेत सिकंदर शेख आणि माऊली कोकाटे यांच्यात तब्बल ११ लाख रुपयांची इनामी कुस्ती रंगली होती.

## झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियानंतर श्रीलंकेचेही उडवली ऐतिहासिक दाणादाण

कोलंबो-टी २० वर्ल्ड कपमध्ये झिम्बॉब्वेने त्यांच्या कामगिरीने सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. झिम्बॉब्वेनं ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर आता श्रीलंकेला देखील पराभवाचा धक्का दिला आहे. झिम्बॉब्वेनं श्रीलंकेवर ६ विकेटनं विजय मिळवला आहे. श्रीलंकेनं पहिल्यांदा फलंदाजी करताना १७८ धावा केल्या होत्या. झिम्बॉब्वेनं १९ व्या ओव्हरमध्ये १८२ धावा करत ६ विकेटनं विजय मिळवला. या विजयासह झिम्बॉब्वेनं ब गटात पहिलं स्थान पटकावलं आहे.

झिम्बॉब्वेकडून ब्रायन बेनेट्ट यानं नाबाद ६३ धावांची खेळी केली. त्याला सिकंदर रझानं ४५ धावा आणि तदिन्वाशे मरुमनी यानं ३४ धावा करत साथ दिली. या विजयानं झिम्बॉब्वेचा आत्मविश्वास वाढला आहे. झिम्बॉब्वेनं या वर्ल्ड कपमध्ये यापूर्वी ऑस्ट्रेलियाला पराभवाचू धूळ चारली होती.




श्रीलंकेनं टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाविरुद्ध शतक झळकावणाऱ्या पाथुम निसांका यानं आजच्या मॅचमध्ये ६२ धावा केल्या. तर, पवन रत्नायके याने ४४ धावांची खेळी केली. कुशल परेरानं २२ धावा केल्या या जोरावर श्रीलंकेने ७ बाद १७८ धावा केल्या. श्रीलंकेनं विजयासाठी झिम्बॉब्वेसमोर १७९ धावांचे आव्हान ठेवले होते. हे आव्हान त्यांनी १९.३ ओव्हरमध्येच पूर्ण केलं. आच्या मॅचमधील दमदार कामगिरीसाठी झिम्बॉब्वेचा कॅप्टन सिकंदर रझा याला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार देण्यात आला आहे.

झिम्बॉब्वेची दमदार कामगिरी

झिम्बॉब्वेच्या संघाने सिकंदर रझाच्या नेतृत्त्वात दमदार कामगिरी सुरु ठेवली आहे. झिम्बॉब्वेला यंदाच्या टी २० वर्ल्ड कपच्या कामगिरीच्या जोरावर पुढील टी २० वर्ल्ड कपमध्ये स्थान मिळाले आहे. झिम्बॉब्वेने ऑस्ट्रेलिया, ओमान आणि श्रीलंकेला पराभूत केले. तर, साखळी फेरीतील झिम्बॉब्वे विरुद्ध आयरलँड यांच्यातील सामना पावसामुळं होऊ शकला नाही. यामुळं झिम्बॉब्वेकडे ७ गुण झाले आहेत. ब गटात झिम्बॉब्वे पहिल्या स्थानावर आहे. तर, श्रीलंका ६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.सुपर ८ मध्ये झिम्बॉब्वे समोर तगडं आव्हान

साखळी फेरीत झिम्बॉब्वेनं ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांच्यासारख्या बलाढ्य संघाला पराभूत केलं आहे. आता सुपर ८ मधून पुढं जायचं असल्यास झिम्बॉब्वेला दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, भारत यांचा सामना करावा लागेल. भारत आणि झिम्बॉब्वे यांचा सामना २६ फेब्रुवारीला होणार आहे. झिम्बॉब्वे आणि वेस्ट इंडिज यांच्यातील सामना २३ फेब्रुवारी रोजी होण-




. इटलीतील कोर्टिना येथे सुरू असलेल्या मिलान-कॉर्टिना हिवाळी ऑलिंपिकमध्ये महिलांच्या कर्लिंग राउंड रॉबिन सत्र ९ सामन्यात भाग घेणारी कॅनडाची एम्मा मिस्क्यू.

## सामना रंगात आला अन् मधमाशांनी हल्ला केला, क्रिकेटच्या मैदानात अंपायरचा मृत्यू

मुंबई-बुधवारची संध्याकाळ एक काळा दिवस ठरली. उन्नावच्या स्प्रू स्टेडियममध्ये अंडर- १३ क्रिकेट सामन्याचा थरार सुरू असताना, अचानक निसर्गाचा कोप झाला आणि अंपायरला आपला जीव गमवावा लागला. मधमाश्यांनी केलेल्या भीषण हल्ल्यात कानपूरचे प्रसिद्ध अंपायर मानिक गुप्ता यांचा मृत्यू झाला, तर दुसरा अंपायर आणि काही लहान क्रिकेटपटू या हल्ल्यात जखमी झाले आहेत.

नेमकं काय घडलं?

शुक्लागंज इथे राहुल सप्रू स्टेडियमवर एचए अकॅडमी आणि एसबीएस अकॅडमी यांच्यात १३ वर्षांखालील मुलांचा क्रिकेट सामना रंगला होता. खेळ ऐन रंगात असताना अचानक मधमाश्यांच्या एका मोठ्या थव्याने मैदानावर आक्रमण केलं. काही कळायच्या आत मधमाश्यांनी खेळाडू आणि अंपायरला डंख मारायला सुरुवात केली. मैदानावर उपस्थित असलेले माणिक गुप्ता मधमाश्यांच्या घेऱ्यात



अडकले. शेकडो मधमाश्यांनी त्यांना एकाच वेळी डंख मारल्याने त्यांची प्रकृती खालावली. माणिक गुप्ता यांना तातडीने कानपूरमधील एका खासगी नर्सिंग होममध्ये नेण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना तातडीने महॅलटफ रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. दुर्दैवाने, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित करताच क्रीडा विश्वात शोककळा पसरली.

माणिक गुप्ता हे कानपूर क्रिकेट असोसिएशनशी गेल्या अनेक वर्षांपासून जोडलेले होते. त्यांच्या निधनाने क्रिकेट क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. या हल्ल्यात सुनील निषाद हे दुसरे पंच आणि काही लहान मुलेही जखमी झाली आहेत, मात्र सुदैवाने त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.प्रशासनाचा हलगर्जीपणा समोर?प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्टेडियम परिसरात आधीच मधमाश्यांचे एक मोठे मोहोळ होते. या मोहोळाचा खेळाडूंना त्रास होऊ शकतो, याची कल्पना असतानाही प्रशासनाने ते हटवण्यासाठी कोणतीही पावले उचलली नव्हती. एका छोट्याशा हलगर्जीपणामुळे एका अनुभवी पंचाचा बळी गेल्याने आता क्रीडा प्रेमींमधून संताप व्यक्त केला जात आहे. जर वेळेत हे मोहोळ काढले असते, तर आज मानिक गुप्ता आपल्यामध्ये असते, अशी भावना व्यक्त होत आहे.या घटनेनंतर क्रिकेट सामना तातडीने थांबवण्यात आला. मानिक गुप्ता यांच्या निधनाचे वृत्त समजताच खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रिकेट असोसिएशनच्या

## महापारेषणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



मुंबई : येथील महापारेषणच्या मुख्य कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस मुख्य विधी सल्लागार श्री. विजय पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे.

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिवादन केले.

सुरूवातीला महापारेषणचे मुख्य विधी सल्लागार श्री. विजय पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांचे स्वीय सहायक श्री. लोटन वळवी, उपव्यवस्थापक (मानव संसाधन) श्रीमती अनिथादेवी थेवर, सहाय्यक अभियंता (स्थापत्य) श्री. आशुतोष चौधरी यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रेयश भिकाने यांचे बारावी जेईई मेन्स परीक्षेत ९९.०९ टक्के घेत नेत्रदीपक यश



**निलंगा/प्रतिनिधी :** लातूरच्या राजश्री शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी श्रेयश नरसिंह भिकाने यांनी बारावीच्या जेईई मेन्स परीक्षेत ९९.०९ गुण मिळवत नेत्रदीपक यश मिळवले आहे.जेईई ची परीक्षा ही जगातील सर्वात अवघड परीक्षा समजली जाते ज्यात श्रेयश ने कठीण परिश्रम घेत हे यश संपादन केल्याबद्दल त्याचे अभिनंदन राजश्री शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य तलवारे सर,प्रा. देशमुख सर,प्रा.संतोषकुमार साहू सर,प्रा कृष्णा पांडे सर,आजी,अजोबा,मामाइंजि.रमाकांत पेटे,सुरेश पेटे,वडील मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने,आई वैद्यकीय अधिकारी डॉ उज्वला भिकाने,वडील बंधू दंतरोगतज्ञ डॉ यश भिकाने,बहीण शिक्षिका अपूर्वा भिकाने आदींनी केले आहे.

## राष्ट्रीय एन्व्हायर्नमेंटल यूथ पार्लमेंटमध्ये लातूरच्या विशाल परिहार यांनी केले महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व



**लातूर/प्रतिनिधी :** नॅशनल एन्व्हायर्नमेंटल यूथ पार्लमेंटच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थी विशाल परिहार यांनी केले. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांची राज्यस्तरावरून राष्ट्रीय स्तरासाठी निवड करण्यात आली होती. ही राष्ट्रीय स्पर्धा दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडली. पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि युवकांची भूमिका या विषयांवर देशभरातील निवडक विद्यार्थ्यांनी प्रभावी मांडणी करत आपले विचार व्यक्त केले.

विविध राज्यांतील स्पर्धकांमध्ये उत्स्फूर्त चर्चा व सादरीकरण झाले.राज्यस्तरीय फेरीत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. उत्कृष्ट सादरीकरण, विषयाची सखोल मांडणी, प्रभावी संवाद कौशल्य आणि नेतृत्वगुण यांच्या जोरावर विशाल परिहार यांनी परीक्षकांची मने जिंकत राष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवले. विशाल परिहार यांनी पर्यावरण संरक्षणासाठी युद्धपातळीवर प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. युवकांनी पर्यावरणीय जबाबदाऱ्या स्वीकारून सक्रिय सहभाग घ्यावा व भविष्यासाठी शाश्वत पर्याय उभारावेत, असे आवाहन केले. या स्पर्धेत उल्लेखनीय सहभागाबद्दल विशाल परिहार यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# शिवरायांच्या विचारांना कृतीतून सलाम 'आमचे ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' ची मागील सहा वर्षांची हरित परंपरा कायम



**लातूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' तर्फे सलग सातव्या वर्षी वृक्षारोपण आणि जनजागृतीचा आगळावेगळा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्ष दिंडी, जनप्रबोधन आणि वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून साजरी करण्यात आलेली ही शिवजयंती सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरली. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या कार्याचा अखंड २४५६ वा दिवस शिवरायांच्या चरणी अर्पण करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर दूरदृष्टी असलेले पर्यावरण रक्षक राजे होते. स्वराज्य उभारताना त्यांनी वृक्षसंवर्धनाला विशेष महत्त्व दिले होते. आज्ञापत्राद्वारे झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे आणि वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले होते. निसर्ग समतोल आणि शाश्वत विकासाचा हा विचार आजही प्रेरणादायी ठरत असून त्याच विचारांची अंमलबजावणी करण्याचा संकल्प आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन सातत्याने करत आहे.

शिवजयंतीनिमित्त मागील आठवड्याभरात संस्थेच्या सदस्यांनी शहरात ६५० नागचाफा वृक्षांची लागवड केली. तसेच आज दयानंद गेट टॅक्सी पॉईंट परिसर आणि स्मृती वृक्षांना टँकरद्वारे मुबलक पाणी देत वृक्षसंवर्धनाची जबाबदारीही पार पाडली.

यानंतर केशरी फेटे, भगवे झेंडे, जनप्रबोधनाची पत्रके आणि रोपे हातात घेऊन शिस्तबद्ध वृक्ष दिंडी काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांना अभिवादन करून उपस्थित नागरिकांना फुलझाडांचे वितरण करण्यात आले.

गेल्या सहा वर्षांपासून शिवजयंती निमित्त दरवर्षी हजाराहून अधिक वृक्ष लागवड करण्याची परंपरा संस्थेने जपली आहे. पहिल्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, दुसऱ्या वर्षी एसपी कार्यालय परिसर, तिसऱ्या वर्षी संविधान चौक ते रिंग रोड दुभाजक, चौथ्या वर्षी स्वामी विवेकानंद चौक ते बाभळगाव चौक, पाचव्या वर्षी एमएसईबी कार्यालय परिसर, सहाव्या वर्षी तहसील कार्यालय परिसर, तर सातव्या वर्षी निवासी महिला पॉलिटेक्निक कॉलेज ते हरंगुळ रेल्वे स्टेशन रस्ता दुभाजकात ६५० पेक्षा अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमास शिवरायांचे अंगरक्षक तसेच पावनखिंडच्या रणसंग्रामातील पराक्रमाशी संबंधित समशेर बहाद्दर कोयाजी राव बांदल यांच्या तेराव्या पिढीतील वंशज अक्षयराव शिवाजीराव बांदल यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनचे सर्व सदस्य आणि बिडवे इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्ष दिंडी यशस्वी केली.

कार्यक्रमाच्या शेवटी आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनचे डॉ. पवन लड्डा यांनी या उपक्रमासाठी तन-मन-धनाने सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनः पूर्वक आभार मानले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा संकल्प यापुढेही अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## मध्य रेल्वेतून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १३७३ दशलक्षहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबई उपनगरीय गाड्यांमधून जानेवारी २०२६ मध्ये १२७ दशलक्षहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. मध्य रेल्वेने २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात (जानेवारी २०२६ पर्यंत) प्रवासी वाहतुकीत उल्लेखनीय वाढ नोंदवली आहे, ज्यामध्ये उपनगरीय आणि गैर-उपनगरीय या दोन्ही विभागांमध्ये स्थिर वाढ नोंदवली आहे.

मध्य रेल्वेने २०२५-२६ च्या आर्थिक वर्षात एकूण १३७३.३९ दशलक्ष प्रवाशांची वाहतूक केली आहे, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील १३४८.३३ दशलक्ष प्रवाशांच्या संख्येपेक्षा १.८६% जास्त आहे.

यामध्ये खालील बाबी समाविष्ट आहे

* आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उपनगरीय गाड्यांमधून १२०१.९३ दशलक्ष प्रवाशांनी प्रवास केला, तर गेल्या वर्षी ११८७.९२ दशलक्ष प्रवाशांनी प्रवास केला आणि



* आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मेल/एक्सप्रेस/पॅसेंजर आणि इतर उपनगरीय गाड्यांमधून १७१.४६ दशलक्ष प्रवाशांनी प्रवास केला, तर गेल्या वर्षी १६०.४१ दशलक्ष प्रवाशांनी प्रवास केला. जानेवारी-२०२६ महिन्यात मध्य रेल्वेतून १४६.२९ दशलक्ष प्रवाशांनी प्रवास केला (ज्यात १२९.०८ दशलक्ष उपनगरीय आणि १७.२० दशलक्ष उपनगरीय नसलेले प्रवाशांनी प्रवास केला). नेरुळ/बेलापूर-उरण विभागात अतिरिक्त सेवा सुरू केल्यानंतर आणि मार्गावर तरघर आणि गव्हाण स्थानके या दोन नवीन स्थानकांच्या कार्यान्वितमुळे उपनगरीय प्रवाशांची संख्या वाढली आहे.

हार्बर मार्गावर वातानुकूलित सेवा सुरू केल्याने १६ दिवसांच्या अल्पावधीत ६ लाखांहून अधिक प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. यामधून आरामदायी आणि रेल्वेच्या कार्यक्षमतेतील वाढीला प्रवासी प्राधान्य देतात हे दिसून येते.

सध्या, मध्य रेल्वे मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या प्रवासाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ९४ वातानुकूलित लोकल सेवांसह १८२० उपनगरीय सेवा चालवते.

मध्य रेल्वे आपल्या सर्व प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी, किफायतशीर, विश्वासार्ह आणि कार्यक्षम वाहतूक प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे आणि वाढत्या प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपल्या सेवा मजबूत करत आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती निमित्त स्वराज्य सप्ताह

**लातूर/प्रतिनिधी :** राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिव सप्ताहाची सुरुवात १३ फेब्रुवारी रोजी सकाळी प्राचार्य सरांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू सर यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, वरिष्ठ समन्वयक मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज हाऊसच्या वतीने करण्यात आले. यावेळी दर्शन देशपांडे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रेरणादायी आढावा घेतला. तसेच कौस्तुभ जोशी सर यांनी शिवाजी महाराजांची आरती सादर करून वातावरण भक्तिमय केले.यावेळी प्राथमिक विभागातील काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत उपस्थित राहून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या शिव सप्ताहात कला विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. शिवराय मनामनात शिवजयंती घराघरात या संकल्पनेतून ही जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू सर यांनी आपल्या मनोगतातून छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श, शौर्य आणि नेतृत्वगुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, असे मार्गदर्शन केले.

तसेच प्रवीण शिवणगीकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाचैतन्य व स्पूर्तीचा जिवंत झरा असून शिवचरित्रातून किमान एखादा गुण प्रत्येकाने आत्मसात करणे हेच खरे त्यांना अभिवादन होईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. सहावीतील विद्यार्थी अद्वैत हवालदार यांने केले.या कार्यक्रमास बीके भालेराव आशिक बनसोडे संदीप केंद्रे विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## संवेदनशील माणूस घडविण्याची ताकद कलेत असते – राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ.संदीपान जगदाळे

### दयानंद विज्ञानमध्ये ललित कला आणि प्रयोगजिवी कला विषयावरील तीन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** कला मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून कलेमुळेच जीवनाचा निर्भेळ आनंद आपणास घेता येतो.म्हणूनच संगीत,चित्र,नाटच,नृत्य,गायन, वादन,शिल्प,साहित्य,वक्तृत्व अशा विविधांगी कलेची जोपासना प्रत्येकांनी केली पाहिजे.आज काळ बदलला अन् बदलत्या काळाबरोबर संस्कृती व मानवाची जीवनशैलीही बदलत चालली आहे.मोबाईल व इंटरनेटच्या आभासी जगात माणूस आणि माणुसकीही कुठेतरी हरवत चालली आहे.अशा या पडत्या काळात संवेदनशील माणूस घडविण्याचे काम कला करते.म्हणून कलेची साधना करा.याचबरोबर आपली संस्कृती व प्राचीन ज्ञान परंपरा यांची जोपासना करीत प्रत्येकांनी सामाजिक बांधिलकीही जोपासली पाहिजे.कारण कला हेच जगण्याचे ऊर्जाकेंद्र असून कलेमुळेच आयुष्याला सौंदर्य प्राप्त होते,असे प्रतिपादन लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ. संदीपान जगदाळे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाच्या वतीने ललित कला आणि प्रयोगजिवी कला या विषयावर दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून बोलत होते.कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ प्रभारी प्रा.मेघा पंडित,डॉ.चंद्रशेखर स्वामी,कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी,डॉ.सुनीता सांगोले, डॉ. रोहिणी शिंदे,डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की,दयानंद शिक्षण संस्था व महाविद्यालयाच्या वतीने उत्तम कलाकार घडविण्यासाठी कलेला व कलाकारांना नेहमी प्रोत्साहन दिले जाते.महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद आहे.विद्यार्थ्यांनी साहित्य,संगीत आणि कलेची जोपासना करताना कार्यशाळेच्या फिल्ड



व्हिजिटच्या माध्यमातून आलेले अनुभव प्रवासवर्णन लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त करावेत असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक प्रा.मेघा पंडित यांनी केले तर आभार निकिता पाटील हिने मानले.सूत्रसंचालन साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ अध्यक्ष पर्णवी ढवारे हिने केले.प्रमुख पाहुण्याचा परिचय परमेश्वर मुंढे यांनी करून दिले.दुपारच्या सत्रात दयानंद कला महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागातील प्रा. आदित्य शिरोळे यांनी साधन व्यक्ती म्हणून मानवी भावनांना कॅमेरा कशा पद्धतीने कॅप्चर करू शकतो, त्या दृष्टीने अँगल फोकस याची माहिती दिली. तसेच फिल्म निर्मिती, मायक्रो ड्रामा, लार्ज ड्रामा,रिल्स निर्मिती, कंटेंट, कॅमेरा टेक्निक्स इत्यादी विषयांवर प्रात्यक्षिकासह सखोल माहिती दिली. तसेच भाषा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या सायबर सुरक्षा काळाची गरज या विषयावरील निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या पर्णवी ढवारे हिला १५००/-रुपये,द्वितीय क्रमांक मिळविलेल्या गीता औटीला १०००/- रुपये तसेच ऊर्जा संवर्धन या विषयावरील निबंध स्पर्धेतील प्रथम क्रमांक मिळविलेल्या पर्णवी ढवारे ५००/- रुपये व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या स्वामी प्रांजलीला ३००/- रुपये तसेच ग्रंथालय विभागातर्फे घेण्यात आलेल्या ऊर्जेची बचत व संवर्धन या विषयावरील स्लोगन स्पर्धेतील प्रथम क्रमांक मिळविलेल्या पर्णवी ढवारे हिला ५००/- रुपये व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या घोडके आरती हिला ३००/- रुपये आणि रांगोळी व चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम देण्यात आली.चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे डॉ. एस.डी. लोखंडे, डॉ. आर. बी. शिंदे, डॉ. कोल्हे , डॉ. टी.एच.मुजावर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.याप्रसंगी ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,डॉ.मनीषा गुरमे,प्रा.राजू मोरे,प्रा.अंगद भुरे,सुनील राक्षे, राजू पांचाळ,संतोष राक्षे,रवी लाहोटी,आशिष इंगळे,साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचे सर्व पदाधिकारी यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि दयानंद विज्ञान व दयानंद कला महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# दयानंद विज्ञानमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी प्र.प्राचार्य डॉ.श्याम इबाते यांनी श्रीमंतयोगी,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक,जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,डॉ.चंद्रकांत स्वामी, हरिओम पाटोळे,सचिन सूर्यवंशी यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मॉडेल इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात; विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांनी रंगला रंग मंच !



कळंब,(प्रतिनिधी)– – शहरातील मॉडेल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन यंदाही उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. येथील साई मंगल कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन कळंबच्या नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांच्या हस्ते देवी सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर नायब तहसीलदार गोपाल तापडिया, कळंब तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास मुळीक, अनंतराव देशमुख तसेच संस्थेचे अध्यक्ष करसन पटेल उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नगराध्यक्षा कापसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्नेहसंमेलन महत्त्वाचे व्यासपीठ आहे. त्यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्या लता यंदे यांनी करत वर्षभर राबविण्यात आलेल्या शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती दिली. स्नेहसंमेलनाची सुरुवात गणपती गीताने झाली. त्यानंतर छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक, कोळीगीत, 'तितली', 'बिजुरिया', विठ्ठल गीत आदी सादरीकरणांतून विद्यार्थ्यांनी रंगतदार कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन व आभार शुभांगी पालकर व बाळासाहेब मुळे यांनी प्रभावीपणे केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख सारिका चव्हाण यांच्या नियोजनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

*** ओलंपियाडमध्ये विद्यार्थ्यांचा गौरव**

ओलंपियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गिलडा पलक, रणदिवे आर्या, पाटील स्वराली व वाघमारे प्रणित या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .

***संगीत क्षेत्रातही प्रथम श्रेणी**

अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई आयोजित परीक्षेत विशेष तबला वादनात माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक माधव कुलकर्णी तसेच पखवाज वादनात विद्यार्थिनी शिवयोग कडबने यांनी प्रथम श्रेणी मिळविल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

***नगराध्यक्षांचे इंग्रजीतील मार्गदर्शन चर्चेत**

नगराध्यक्षा कापसे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण मार्गदर्शन इंग्रजी भाषेत केले. आजवर अनेक नगराध्यक्षांनी पद भूषविले; मात्र विद्यार्थ्यांशी इंग्रजीत संवाद साधण्याचा हा पहिलाच अनुभव असल्याने उपस्थितांमध्ये याची विशेष चर्चा रंगली. शिक्षण व विकासाच्या दृष्टीने हा सकारात्मक संदेश असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंबिका कदम, वैशाली राऊत, आयेशा पठाण, नंदिनी खरबड, सौ. इंगळे, सुप्रिया चव्हाण, आम्रपाली कसबे, जनाबाई थोरात, सारिका चव्हाण, अभंग साक्षी, भारत शिंदे, दामोदर शिंदे, सौ. जोशी, पोपट लोमटे, बसवेश्वर शिंगणापूरे तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती माने, पवार, सौ. उबाळे, संजीव शेळके, दत्तात्रय ताटे, अशोक पुरी यांनी परिश्रम घेतले.

स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा व बौद्धिक क्षमतांना नवे व्यासपीठ मिळाले असून, कार्यक्रमाने उपस्थित पालक व नागरिकांची मनं जिंकली.

# पोलिस वसाहतीच्या जागेवर घाणीचे साम्राज्य

कसबे तडवळे : गावातील मुख्य बाजार मैदानालगत असलेली गृहखात्याची १७ गुंठे जागा सध्या अडगळीत पडली असून परिसरातील नागरिकांसाठी ती मोठी डोकेदुखी ठरत आहे. या जागेवर इंग्रजकालीन पोलिस वसाहतीची पडझड झालेली इमारत उभी आहे. गवत, काटेरी झाडे आणि कचऱ्याचा साठा वाढल्याने सापांचा वावर वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कसबे तडवळे हे गाव इंग्रजकालीन इतिहासाशी जोडलेले आहे. त्या काळात पांगरी पोलिस ठाण्यांतर्गत येथे पोलिस चौकी होती. या १७ गुंठे जागेत दगडी बांधकामाच्या पाच पोलिस वसाहती उभारण्यात आल्या होत्या. पुढे सुमारे १९७० नंतर गावाचा समावेश सोलापूर जिल्ह्यातून धाराशिव जिल्ह्यात करण्यात आला आणि ढोकी पोलिस ठाण्यांतर्गत तडवळे बीट कार्यरत झाले. सुमारे वीस वर्षे येथे पोलिस अधिकारी व कर्मचारी वास्तव्यास होते; मात्र १९९५ नंतर ही वसाहत पूर्णपणे बंद पडली.गेल्या वीस वर्षांत इमारतींची दुरुस्ती न झाल्याने कौलारू छप्पर कोसळले आहेत.






पावसाच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर गवत व झाडे वाढली असून परिसरात सापांचा वावर वाढला आहे. चारही बाजूंनी दाट लोकवस्ती असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

कचरा टाकण्यामुळे दुर्गंधी पसरत असून डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेकदा ग्रामपंचायतीने पोलिस व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केला; मात्र ठोस कार्यवाही झालेली नाही.गावातील नेत्यांनी ही जागा ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यासाठी प्रयत्न केले; परंतु ती गृहखात्याची मालमत्ता असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेला थेट हस्तक्षेप करता येत नसल्याची चर्चा आहे.

# वर्गीय पवनराजे निंबाळकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !



धाराशिव (प्रतिनिधी)– सर्वसामान्यांच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण करणारे लोकनेते, स्वर्गीय पवनराजे निंबाळकर साहेब यांच्या जयंतीनिमित्त आज 'पवनराजे कॉम्प्लेक्स' येथे त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. हा दिवस केवळ स्मरणाचा नसून, साहेबांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचा दिवस असल्याचे भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

या जयंती दिनाचे औचित्य साधून पवनराजे कॉम्प्लेक्स येथील त्यांच्या प्रतिमेस व स्मृतीस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. साहेबांनी आयुष्यभर जोपासलेली मूल्ये आणि जनसेवेचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी केला.

याप्रसंगी उपस्थित मान्यवर सहसंपर्क प्रमुख नंदू भैया राजेनिंबाळकर, अतिश भैय्या पाटील, शहर प्रमुख सोमनाथ गुरव, प्रवीण कोकाटे, राजाभाऊ पवार, गणेश खोचरे, संभाजी सलगर, प्रशांत साळुंके, नितीन गरड, मनोज पडवळ, मोईन पठाण, सतीश लोंढे, विनोद केजकर, शहाजी पवार, अमित लोंढे, बापू चव्हाण, हनुमंत देवकत्ते, सह्याद्रीराज राजेनिंबाळकर, रवी कोरे, महेश उपासे, संदीप शिंदे, सुरज पडवळ, प्रभाकर राजेनिंबाळकर, ओम भिसे, गायकवाड सर.

यावेळी उपस्थित सर्वांनी पवनराजे साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. साहेबांचे कार्य हे आमच्यासाठी सदैव मार्गदर्शक राहील, अशा शब्दांत मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



नळदुर्ग (विजय पिसे)–जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा जळकोट येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मान्यवरांच्या हस्ते सर्वप्रथम प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर श्री बबन मोरे यांनी आपल्या मनोगतातून शिवाजी महाराज यांच्या अंगी असलेले अजोड युद्ध कौशल्य, गनिमी कावा, प्रजादक्ष, निधर्मी राजकर्ता, दुरु दृष्टी असलेले गुणग्राहक राजा या सर्व गुणांची माहिती देऊन शिवरायांची प्रेरणा घेऊन आपणही त्याप्रमाणे वाटचाल करावी असे सांगितले त्यानंतर तंटामुक्ती अध्यक्ष श्री यशवंत कदम यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर शिवसेना नेते कृष्णात अण्णा मोरे यांनी शिवजयंती निमित्त मुलींसाठी प्रेरणादायक मनोगत व्यक्त करण्यात आले त्यानंतर इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनीनी लेझीम नृत्य सादर केले. तसेच आम्ही जिजाऊच्या कन्या हे गीत सादर करण्यात आले. व सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माजी सरपंच अशोक भाऊ पाटील, तंटामुक्ती समिती अध्यक्ष यशवंतराव कदम, शिवसेना नेते कृष्णातअण्णा मोरे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चुंगे, चेअरमन राजू पाटील ,बबन मोरे, अनिल छत्रे इत्यादी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक श्री इटकरी सर व प्रगती किलजे, प्रियंका सुरवसे ,अक्षरा चव्हाण यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री सौदागर श्री शेख, श्रीमती बनसोडे एम .एस. व अभिवंत एस. जी. यांनी केले आभार श्री अभिवंत एस. जी .यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता आनंदीमय वातावरणामध्ये झाली.

# व्ही पी एज्युकेशनल कॅम्पस मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

धाराशिव (प्रतिनिधी)–व्ही पी एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य व प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशाच्या इतिहासात स्वराज्याचे स्वप्न साकार करणाऱ्या आणि आदर्श शासनव्यवस्था उभारणाऱ्या शिवरायांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या शौर्य, धैर्य, दूरदृष्टी, न्यायनिष्ठा आणि संघटन कौशल्याचा गौरव करत त्यांच्या जीवनचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडले.

यावेळी एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, एस.पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, वेलनेस फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूजा आचार्य, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा. डी. एम. घावटे तसेच कॅम्पसमधील सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समारंभपूर्वक पार पडले. शिवरायांच्या जयघोषात आणि देशभक्तीपर वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आलूर -बोळेगाव प्रलंबित रस्ता काम लागणार मार्गी, डॉ. रामलिंग पुराणे यांच्या पाठपुराव्याला यश



मुरूम (प्रतिनिधी)– राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब मुरूम मोड ते मुरूम -आलूर -बोळेगाव मार्गे अक्कलकोटला जोडणारा रस्ता काम घिसाड घाईने उरकण्यात आले त्यामुळे रस्त्यावर ठिठिकाणी खड्डे पडले आहेत त्याचबरोबर आलूर -बोळेगाव रस्ता काम अद्याप प्रलंबित असल्याने वाहतुकीस, नागीरकांना त्रासाना सामोरे जावे लागत आहे, याबाबत समाजसेवक तथा बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी १४ सप्टेंबर रोजी सदरील प्रलंबित रस्त्यावरील पाणी साचलेल्या खड्ड्यात बसून लाक्षणिक आंदोलन करीत संबंधित विभागाला रस्ता काम तात्काळ पूर्ण करावी अशा मागणीचे पत्र दि. १८. ०९. २०२५ व दि. ०६ ऑक्टोबर रोजी ईमेलच्या माध्यमातून केली होती अन्यथा दि. १४ ऑक्टोबर पासून आमरण उपोषण आंदोलन छेडण्याचा ईशारा पत्रात दिला होता. संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन दि. १३ ऑक्टोबर रोजी मुरूम पोलीस स्टेशन येथे सहायक पोलीस निरीक्षक संदीप दहिफळे, राष्ट्रीय महामार्ग विभाग अधिकारी, शेतकरी, बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांच्यात बैठक संपन्न झाली आणि सदरील १३०० मीटर रस्त्यावर तूर्तास दुरुस्ती करण्यास शेतकऱ्यांनी समत्ती दर्शवली त्यामुळे आणि संबंधित विभागाच्या लेखी आश्वासना नंतर १४ ऑक्टोबर रोजीचा आंदोलन स्थगित करण्यात आला होता. त्यानंतर संबंधित विभागाने तात्काळ मुरूम मोड ते बोळेगाव रस्त्यावरील ठिक ठिकाणचे खड्डे दुरुस्ती काम आणि प्रलंबित रस्त्यावर मुरूम टाकून दुरुस्ती करण्यात आले. मात्र डांबारीकरण काम अद्याप प्रलंबित आहे, सदरील विषयावर डॉ. पुराणे यांचा कायम पाठपुरावा चालू होता पुन्हा ११ जानेवारी २०२६ रोजी पत्र पाठवून प्रलंबित आलूर -बोळेगाव रस्ता (१३००) रस्ता काम पूर्ण करण्यास विनंती केली होती, मात्र शेतकऱ्यांची अधिक जमीन अधिग्रहण म्हणजे भूसंपादन रक्कम मंजुरी मिळाले नसल्याने सदरील रस्ता काम अद्याप प्रलंबित आहे. दि. १८. ०२. २०२६ रोजी संबंधित विभागानी पत्र पाठवून सदरील रस्ता कामासाठी भूसंपादन ची मंजुरी भूतल परिवहन मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून प्राप्त झाली असून सदरच्या मंजुरी अन्वये भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून आलूर बोळेगाव रस्त्याचे (१३००मी ) रस्ता काम हाती घेऊन पूर्ण करण्यात येणार असल्याबाबत पत्राद्वारे डॉ. रामलिंग पुराणे यांना कळवीण्यात आले आहे.

बसव प्रतिष्ठानच्या माध्यमातून सप्टेंबर महिन्यापासून सदरील रस्त्याबाबत पाठपुरावा चालू होते. सदरील रस्त्याची दयनीय अवस्था मुळे नागरिक, प्रवाशी वाहनाना, अक्कलकोट श्री स्वामी समर्थ दर्शनासाठी जा-ये करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सोसवे लागत होते तर दुसऱ्या बाजूला शेतकरी बांधव आपल्या हक्कासाठी लढत होते. त्यामुळे हा विषय अवघड जरी असले तर यावर मार्ग काढणे महत्वाचे होते. या संदर्भात खोलवर जाऊन पाठपुरावा करण्यात आले आणि आजरोजी शेतकरी बांधवाना व नागरिकांना न्याय मिळवून देण्यास यश प्राप्त झाले, भूसंपादनास मंजुरी जरी मिळाले असले तरी पुढील कारवाई साठी शेतकऱ्यांनीही सहानुभूती दाखवून शासनास रस्ता काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे, मंजुरी मिळाल्यानंतर तुरंत रक्कम मिळत नसते त्याचे कारवाई चालू असते परंतु त्या कारवाई साठी रस्ता काम थांबवू नये एवढीच विनंती शेतकरी बांधवाना आहे.असे मत - डॉ. रामलिंग पुराणे, समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठान योनी व्यक्त केले.


## लातूर समाचार धाराशिव

## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४


सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649